भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०२/२०१७

**१) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १३/०२/२०१७ चे १०.३० ते १५.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादीची मुलगी वय १७ वर्ष ही शाळेत गेली असता ती घरी परत न आल्याने तीचा गावात नातवाईकात शोध घेतला असता मिळुन न आल्याने तसेच गावातील लोकांचे चर्चे वरून यातील संशयीत आरोपी हा पुर्वी फिर्यादीचे मुलीसोबत बोलत असल्याने त्याने मुलीला फुस लावुन पळवुन नेले आहे असे फिर्यादीचे त्याच्या वर संशय असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी भजने पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे एक जखमी . :—**

दिनांक १४/०२/२०१७ चे ०५.४५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी अक्षय देवचंद तलमले वय २० वर्ष, रा. नेरी वरुन पिंपळगाव येथे पायदळ व्यायाम करण्याकरीता नदीचे पुलीयावर गेला असता नेरी कडुन पिंपळगाव कडे जाणाऱ्या यातील अज्ञात आरोपी दुध वाहक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीस धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९, ३३७,३३८ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) घराचा दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन सामानाची चोरी . :—**

दिनांक १४/०२/२०१७ चे ०१.५० वा. दरम्यान. यातील फिर्यादी सौ. तुळसाबाई रामरतन हजारे वय ४० वर्ष, रा. नेरी हिचे घर गावाबाहेरील सातोना रोड शेतबांधीत असुन फिर्यादी ने आपल्या घराला कुलुप लावुन शेता मध्ये गेली असता कोणीतरी अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन तीचे घराच्या समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन नगदी १७,०००/—रु. सोन्याचे तुटलेले पदक ३ ग्रॅम किंमती ७,०००/—रु. २ डोर लाखाचे १० मणी किंमती ३,०००/—रु. असा एकुण २७,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) बिना पास परवाना अवैद्य रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०२/२०१७ चे २१.०० वा. दरम्यान. दिनांक १४/०२/२०१७ ला पो.स्टे परीसरात पोलीस स्टॉप सह पेट्रोलींग करीत असतांना नियत्रंण कक्ष येथुन माहीती मिळाली की, रंजीत गजभीये रा. पाचगाव परीसरात अवैद्य रित्या ट्रक भरुन रेती वाहतुक करीत आहेत त्यावरुन स्टे. डा. अंमलदार यांना फोनवरुन पो.स्टे. स्टॉप सह पाचगाव ते नेरी रोड वर गेले असता रोडच्या बाजुला यातील आरोपी ट्रक मध्ये अवैद्य रित्या बिना पास रवाना रेती भरुन ट्रक मध्ये १) ट्रक क्र. एमएच ३६ एफ ७१२२ २) ट्रक क्र. एमएच ३६ एफ २१२२ हे रेती ने भरलेले थांबलेले ट्रक दिसले त्या मध्ये प्रत्येकी ३ ब्रास रेती किमती १२,०००/—रु. ची मिळुन आल्याने त्यांनी रस्त्यावर आपले वाहन सोडुन पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी खंडाते पो.स्टे. वरठी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक १४/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा व सिहोरा येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन किंमती ३,०००/—रु. तसेच जुगारातुन किंमती ३,०३,८२०/—रु. असा एकुण किंमती ३,०६,८२०/—रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.